MHNS280000022023

## नियमित दिवाणी दावा क्र.९४/२०२३ मध्ये निशाणी क्र.४२ वर आदेश

प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांच्यावर दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ९४ सह आदेश ३८(१) अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ चे असे म्हणणे आहे की, सदरच्या प्रकरणाच्या न्यायालयीन कार्यवाहीत वादी वारंवार अडथळा निर्माण करत असल्यामुळे न्यायालयाच्या इतर कामकाज बाधित होत आहे. त्यामुळे वादी यांच्यावर दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ९४ सह आदेश ३८(१) अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही व्हावी अशी विनंती केलेली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे दाखल करून हरकत घेतलेली आहे. वादीचे म्हणणे असे आहे की, वादीकडुन नजरचुकीने दावा दुरूस्ती करावयाची राहुन गेलेली आहे. वादी एक स्वतंत्र अर्ज देत आहे. सबब, सदरच्या अर्जातील मागणी नामंजूर करावी अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचे तोंडी म्हणणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, वादी यांनी निशाणी क्र. २४ वर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये प्रस्तावित प्रतिवादी क्र. ३ दाव्यामध्ये सामिल करण्यासाठी अर्ज दिलेला होता. सदर अर्ज माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.०३/०२/२०२५ रोजी मंजुर केला. तथापि, वादी यांच्याकडुन सदर आदेशाप्रमाणे विहित मुदतीमध्ये पुर्तता करण्याचे राहुन गेले. तदनंतर त्यांना दि. ०३/०७/२०२५ रोजी निशाणी क्र.२५ वर निशाणी क्र.२४ च्या आदेशाची पुर्तता करण्यास परवानगी मिळावी म्हणुन अर्ज दिलेला होता. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिल्यानंतर सदर निशाणी क्र.२५ च्या अर्जावर म्हणणे दिले. प्रतिवादी क्र.

१ यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी निशाणी क्र.२४ आदेशाची पुर्तता करीत नसल्यामुळे दिलेला आहे. तथापि, निशाणी क्र.२५ वर वादी यांनी अर्ज दाखल करून पुर्ततेकरीता परवानगी मागितल्याचे दिसुन येते. सदर निशाणी क्र.२५ वरील अर्ज आज रोजी प्रतिवादी क्र.१ यांना खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करून निशाणी क्र.२४ च्या आदेशाची पुर्तता करण्यास परवानगी दिलेली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज सद्य स्थितीस निष्फळ ठरत आहे. करीता, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येतो.

SACHIN HINDURAO KHADE

Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2025.12.10 17:15:42 +0530

सिन्नर.
दि.१०/१२/२०२५

(सचिन एच.खाडे)
दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,सिन्नर